# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. २०/२०१४ दि. १२.०९.२०१४

| | |
|---|---|
| श्री.शैलेश शरदचंद्र जागुष्टे<br>लक्ष्मी निवास, ओझरे खुर्द<br>ता.संगमेश्वर, जिं.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर,<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री. शैलेश शरदचंद्र जागुष्टे |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. रमेश बापूसाहेब कदम<br>उपकार्यकारी अभियंता,<br>उपविभाग देवरुख<br>२) श्री. मिलींद शांताराम कानडे<br>उपव्यवस्थापक (विवले)<br>रत्नागिरी विभाग |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनिमय २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री. शैलेश शरदचंद्र जागुष्टे, लक्ष्मी निवास ओझरे खुर्द, ता.संगमेश्वर,जिल्हा रत्नागिरी यानी त्यांचे नवीन बांधलेल्या घरासाठी वीजपुरवठा मिळणेसाठी अर्ज व इतर सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन देखील महावितरणकडून कनेक्शन मिळत नसल्याबाबतची तक्रार दि.१२.०९.२०१४ रोजी या मंचाकडे फॉर्म 'अ' मध्ये दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्रं.१३५ दि.१५.०९.२०१४ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय, रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. महावितरणने देखील त्यांचे पत्र क्रं. ७०७४ दि. २९.०९.२०१४ अन्वये आपले स्पष्टीकरण मंचाकडे सादर केले आहे. त्यानंतर अधिनियमामधील तरतुदीनुसार उभयपक्षाना नोटीस काढून दि.०७.१०.२०१४ रोजी सुनावणीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असे की त्यानी मौजे ओझरे खुर्द येथे बांधलेल्या नवीन घरासाठी वीजेचे कनेक्शन मिळावे म्हणून दि.२१.१२.२०१३ रोजी अर्ज केला तसेच आवश्यक ती सर्व कागदपत्रे जमा करुन देखील त्याना कोटेशन पण देण्यात आले नाही म्हणून दि.०६.०३.२०१४ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केला. सदर अर्जास अनुसरुन कक्षाने दि.१७.०५.२०१४ रोजी निर्णय दिला असून घरगुती कनेक्शनच्या बाबतीत कोटेशन देण्याबाबत आदेश दिला होता. त्यानंतर महावितरणकडून दि.१९.०६.२०१४ रोजी कोटेशन प्राप्त झाले व लागलीच दि.२०.०६.२०१४ रोजी त्यानी आवश्यक ती रक्कम भरलेली आहे पण आवश्यक रक्कम भरुन तसेच सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन देखील त्यांच्या घराचे कनेक्शन न मिळालेमुळे त्यानी या मंचाकडे तक्रार दाखल केली असून हे कनेक्शन ताबडतोब मिळावे तसेच मानसिक त्रासाबाबत भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

महावितरणकडून दाखल करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद करण्यात आले आहे की श्री. जागुष्टे यानी नमुद केलेल्या घरासाठी वीज पुरवठा करणेसाठी तीन पोलाची आवश्यकता आहे. तक्रारदारानी दि. ०६.०३.२०१४ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०१.०५.२०१४ रोजी स्थळ परिक्षण केले असता घराचे बांधकाम तसेच संच मांडणीचे अद्यापही केले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वीज संच मांडणीचे काम पुर्ण करुन पुन्हा नवीन चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तशा आशयाचे पत्र देखील ग्राहकास दि. ०२.०५.२०१४ रोजी दिलेले आहे. दरम्यान कक्षाने दिलेल्या आदेशाप्रमाणे दि.१८.०६.२०१४ रोजी अंदाज पत्रकास मंजूरी देऊन दि.१५.०६.२०१४ रोजी कोटेशन पण दिलेले आहे. ग्राहकानी इतर सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असली तरी नवीन चाचणी अहवाल दिलेला नसल्यामुळे हा अर्ज परिपुर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्र वीज नियामक आयोग २००५ विनिमय ५.८ च्या तरतुदी नुसार हा अर्ज निकाली काढण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच तक्रारदाराचा अर्ज अपुर्ण असल्यामुळे ते सद्य परिस्थितीत कोणत्याही नुकसान भरपाईस पात्र होऊ शकत नाही असे नमुद केले आहे.

दि. ०७.१०.२०१४ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीमध्ये स्वत: अर्जदार श्री. जागुष्टे व महावितरणकडून श्री. रमेश कदम उपकार्यकारी अभियंता यानी सुनावणीमध्ये भाग घेऊन आपला युक्तीवाद सादर केला.

श्री. जागुष्टे यानी युक्तीवाद सादर करताना नमुद केले की, सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन तसेच त्या कागदपत्रासोबत चाचणी अहवाल देऊन देखील महावितरणकडून कोटेशन देखील देण्यात आले नाही. कक्षाकडे तक्रार दाखल केल्यानंतर महावितरणकडून दि.०१.०५.२०१४ रोजी सर्व्हे करण्यात आला ही बाब चुकीची असून त्या दिवशी महाराष्ट्र दिनाची सुट्टी असल्यामुळे ही बाब मान्य करण्यासारखी नाही. घराचे बांधकाम पुर्ण झालेले आहे, वायरींगचे काम देखील पुर्ण झालेले आहे घराचे सर्व काम जनरेटर लाऊन पुर्ण केलेले असून हा खर्च यापुढे अवाक्या बाहेरचा असल्यामुळे लागणारी वीजवाहीनी उभी करुन ताबडतोब कनेक्शन देण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली.

श्री. कदम उपकार्यकारी अभियंता यानी महावितरणच्या वतीने युक्तीवाद करताना नमुद केले की, श्री जागुष्टे यांचे घर अगदी येण्याजाण्याच्या रस्त्यावर असून सुट्टी असली तरी ग्राहकाने कक्षाकडे तक्रार दाखल केल्यानंतर स्थळ परिक्षण केलेले आहे आजतागायत घराचे काम अपुर्ण आहे तसेच वायरींगचे काम पण झालेले नाही त्यामुळे तक्रारदारानी यापुर्वी सादर केलेला चाचणी अहवाल ग्राहय धरता येणार नाही. महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००५ मधील विनिमय ५.८ नुसार हा अर्ज अद्याप अपुर्ण आहे त्यामुळे मंचानी ही तक्रार फेटाळण्याबाबत विनंती केली. तसेच हया घराचे कनेक्शनसाठी तीन पोलची आवश्यकता असून सदर वाहीनी उभी करण्यासाठी अद्याप डि.पी.डी.सी. कडून निधीची उपलब्धता झालेली नाही त्यामुळे निधीची उपलब्धता झालेनंतर व अर्जदाराने नवीन चाचणी अहवाल सादर केल्यानंतर जेष्ठता यादीनुसार हे काम पुर्ण करण्यात येईल.

त्यानंतर मंचाने देखील महावितरणकडून मांडलेला मुद्दा योग्य असल्याचे नमुद करुन तक्रारदारास वायरींगचे काम पुर्ण करुन पुन्हा नवीन चाचणी अहवाल सादर करण्याबाबत तसेच घराचे व वायरींगचे काम पुर्ण झाल्याचे फोटोग्राफ सादर करण्याबाबत आदेश दिला सदर अर्जास अनुसरुन तक्रारदारानी दि. ०८.१०.२०१४ रोजी महावितरणकडे नवीन चाचणी अहवाल दाखल केला असून त्याची पोचपावती तसेच आपल्या घराचे व वायरींगचे फोटो दि.१०.१०.२०१४ रोजी मंचाकडे सादर केले आहेत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल झालेली सर्व कागदपत्रे तसेच उभयपक्षानी केलेला युक्तीवाद या सर्व बाबींचा विचार करता मंचाच्या निर्देशनास आले आहे की अर्जदारानी आपल्या कनेक्शनसाठी दि.२१.१२.२०१३ रोजी अर्ज सादर केला असून महावितरणकसून नमुद केल्याप्रमाणे आपल्या घराचे वायरींगचे काम अपुर्ण असताना देखील दि.०८.०१.२०१४ रोजी चाचणी अहवाल सादर केलेला आहे. अशा अपरिपुर्ण वायरींगसाठी सादर करणेत आलेला चाचणी अहवाल ग्राहय मानता येणार नाही. त्यामुळे सुनावणी दरम्यानच मंचाकडून सुचना केल्याप्रमाणे अर्जदारानी नवीन चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

महावितरणकडून नमुद करण्यात आलेल्या डि.पी.डी.सी. कडून निधीची उपलब्धता तसेच कंत्राटदार मिळणे साहित्याची उपलब्धता नसणे वगैरे बाबींचा सद्यपरिस्थितीत विचार करता येऊ शकत नाही कारण अर्जदाराचे घराचे काम पुर्ण झालेले असून वीजेच्या कनेक्शन शिवाय सदर घरामध्ये वास्तव्य करणे शक्य नाही. अर्जदारानी मंचाकडून सुचित केल्याप्रमाणे चाचणी अहवाल सादर केलेला असून अधिनियमामधील तरतुदीनुसार हा अर्ज परिपुर्ण झालेला आहे. त्यामुळे महावितरणने महाराष्ट्र वीज नियामक आयोग कृती मानके २००५ मधील क्रं. ४ मध्ये दिलेल्या

तरतुदीनुसार सदर वीज कनेक्शनचे काम पुर्ण करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. तसेच सुनावणी दरम्यानच या निष्कर्षासाठी महावितरणकडून देखील सम्मती देणेत आलेली आहे.

मंचाने नमुद केलेल्या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार मान्य करण्यात येत आहे.**
**२) तक्रारदाराचा अर्ज परिपुर्ण झालेला असल्यामुळे अधिनियमामधील तरतुदीनुसार सदर कनेक्शन देण्यात यावे**
**३) खर्च व अनुषंगिक बाबीकरीता कोणताही आदेश नाही.**
**४) या आदेशाचे पालन करुन पूर्तता अहवाल मंचाकडे पाठविण्यात यावा.**
**५) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**६) या आदेशाचे महावितरणकडून पालन न झाल्यास वीज कायदा २००३ मधील कलम १४२ नुसार ग्राहक खालील पत्त्यावर तक्रार करु शकतो.**

**पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**१३ वा मजला, केंद्र क्रं. १,**
**जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,**
**कुलाबा मुंबई ४००००५**
**फोन नं.०२२ - २२१६३९६४/६५/६९**

| | | |
|---|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री. व्हि.बी.जगताप** | **श्री.ज.पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सचिव / कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- १४.१०.२०१४**
**ठिकाण :- रत्नागिरी.**